निवडणूक तात्काळ
ई-मेलव्दारे

तांत्रिक व इतर अडचणींमुळे प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम राबविलेल्या १० जिल्ह्यांतील ११६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम- सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१४/का-८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in
दिनांक: २२ सप्टेंबर २०१७

प्रति,
जिल्हाधिकारी,
(सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक, जळगाव, सातारा,
कोल्हापूर, बीड, जालना, अमरावती व वाशीम).

विषय :- तांत्रिक व इतर अडचणींमुळे प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम राबविलेल्या १० जिल्ह्यांतील ११६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुधारीत निवडणूक कार्यक्रम- सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी.

संदर्भ :- १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८, दि.०१ सप्टेंबर २०१७ रोजीचा निवडणूक कार्यक्रमाबाबतचा आदेश.
२) आयोगाचा समक्रमांकाचा दि.१३ सप्टेंबर २०१७ रोजीचा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम.

महोदय/महोदया,

ज्याअर्थी, आयोगाच्या उक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रानुसार मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम दि.१३ सप्टेंबर २०१७ रोजी आपणास देण्यात आलेला आहे आणि,

ज्याअर्थी, या कार्यक्रमानुसार दि.२३ सप्टेंबर २०१७ रोजी संबंधित ठिकाणी प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्यात येणार आहेत,

त्याअर्थी, उक्त १० जिल्ह्यांतील संबंधित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणुकीचा सुधारीत कार्यक्रम सोबत परिशिष्ट-अ मध्ये जोडण्यात येत आहे. या कार्यक्रमानुसार संबंधित ठिकाणी आज मध्यरात्रीपासून आचारसंहिता लागू होईल व ती निवडणुकीचा निकाल लागेपर्यंत अस्तित्वात राहिल. सदर निवडणूक कार्यक्रमाची

अंमलबजावणी करताना उक्त संदर्भ क्र.१ च्या निवडणूक कार्यक्रमाबाबतच्या आदेशातील संबंधित निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

तसेच या ग्रामपंचायतींसाठी संबंधित उपविभागीय अधिकारी यांची निवडणूक निरीक्षक म्हणून परस्पर नेमणूक करून त्याबाबत आयोगास सूचित करण्यात यावे.

सदर सुधारित कार्यक्रमाबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर सर्व प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी व आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२१/९/१७

सोबत- परिशिष्ट-अ

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**प्रत :** १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वित्त विभाग, सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -०३२.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
६. विभागीय आयुक्त (सर्व संबंधित) यांना उचित कार्यवाहीसाठी.
**७. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.**
८. पोलीस महानिरीक्षक (सर्व), महाराष्ट्र राज्य.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबंधित)
१०. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व संबंधित)
११. सहायक आयुक्त, मतदान साहित्य शाखा यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी
१२. संगणकीकरण शाखा, रानिआ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
१३. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना उचित कार्यवाहीसाठी.
१४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने
१५. निवड नस्ती (२ प्रती).

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१४/का-८, दि.२२/०९/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-अ

मतदान दि.२७/१०/२०१७

## तांत्रिक व इतर अडचणींमुळे प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम राबविलेल्या १० जिल्ह्यांतील ११६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुधारीत निवडणूक कार्यक्रम- सरपंच पदासह सर्व सदस्य पदांसाठी.

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२६/०९/२०१७ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०६/१०/२०१७ (शुक्रवार) ते दि.११/१०/२०१७ (बुधवार) वेळ स. ११.०० ते दु. ४.३० |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१२/१०/२०१७ (गुरूवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१६/१०/२०१७ (सोमवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.१६/१०/२०१७ (सोमवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.२७/१०/२०१७ (शुक्रवार) स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.२८/१०/२०१७ (शनिवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा कालावधी | दि.२८/१०/२०१७ (शनिवार) ते दि.३०/१०/२०१७ (सोमवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

Aswarde
22/9/17

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र